## राज्यातील हवामान, खरीप हंगाम २०२०-२१ पिक पेरणी व पिक परिस्थितीचा दिनांक २७/०७/२०२० अखेरचा अहवाल

**हवामान व पर्जन्यमान** : राज्यात दि.११ ,जून २०२० रोजी मान्सूनचे आगमन झाले. दि.१६ जून ,२०२० पर्यंत मान्सूनने संपूर्ण महाराष्ट्र व्यापला. अहवाल कालावधीत बहुतांश विभागात आकाश ढगाळ होते व बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

नागपूर विभागात तुरळक ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार तर कोकण, नाशिक, पुणे, औरंगाबाद, लातूर व अमरावती विभागात तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**पर्जन्यमान (२०२०)**

दि. १ जून ते २७ जुलै कालावधीमधील राज्यातील सरासरी पाऊस ४९५.८ मि.मी. असून दि.२७ जुलै, २०२० पर्यंत ४९०.९ मि.मी. म्हणजेच सरासरीच्या ९९.०१ टक्के पाऊस झाला. मागील वर्षी दि.२७.०७.२०१९ अखेर ४६१.७ मि.मी. म्हणजेच सरासरीच्या ९३.१२ टक्के पाऊस झाला.

राज्यात दि. १ जून ते २७ जुलै, २०२० अखेरीस सरासरीच्या तूलनेत प्रत्यक्ष पडलेल्या पावसानुसार (प्रागतिक) जिल्ह्याची वर्गवारी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पर्जन्यमान टक्केवारी | जिल्हे संख्या | जिल्ह्यांची नावे |
|---|---|---|---|
| १ | ० ते २५ % | ० | --- |
| २ | २५ ते ५० % | ० | --- |
| ३ | ५० ते ७५ % | ०८ | ठाणे, रायगड, पालघर, नंदुरबार, पुणे,सातारा, कोल्हापूर, गडचिरोली. |
| ४ | ७५ ते १०० % | १० | रत्नागिरी, नाशिक, उस्मानाबाद, नांदेड, अकोला, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर. |
| ५ | १०० % पेक्षा जास्त | १६ | सिंधुदुर्ग, धुळे, जळगांव, अहमदनगर, सोलापूर, सांगली, औरंगाबाद, जालना, बीड, लातूर, हिंगोली, परभणी, बुलढाणा, वाशिम, अमरावती, यवतमाळ. |

राज्यात २७ जुलै, २०२० अखेर पर्जन्यमान सरासरीच्या तूलनेत एकूण ३५५ तालूक्यांपैकी १९ तालूक्यांत २५ ते ५० %, ५५ तालूक्यात ५० ते ७५ %, ८३ तालूक्यात ७५ ते १००% तर १९८ तालूक्यात १०० % पेक्षा जास्त पाऊस झाला आहे.

**पर्जन्यमान तपशिल (मि.मी) दि.२७.०७.२०२० अखेर**



### किड व रोग-

राज्यात काही ठिकाणी ज्वारी व मका पिकावर लष्करी अळीचा, भात पिकावर पिवळी खोडकिड व निळे भुंगेरे या किडींचा, सोयाबीन पिकावर हेलिकोव्हर्पा, गर्डल बीटल, खोडमाशी, उंट अळी व तंबाखुवरील पाने खाणारी अळीचा, कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, अमेरिकन बोंड अळी, मावा तुडतुडे या किडींचा तर ऊस पिकावर हुमणीचा प्रादुर्भाव दिसून आला.

किड व रोगाच्या व्यवस्थापनासाठी शेतीशाळा, कृषि विद्यापीठाकडील पिक संरक्षण सल्ले, सर्वेक्षणासाठी योजनांतर्गत फेरोमेन सापळे व ल्युर्सचा पुरवठा,बाधित क्षेत्रास तज्ञांच्या भेटी इत्यादी माध्यमातून उपाययोजना करण्यात येत असून, या अनुषंगाने प्रचार व प्रसिध्दीची कार्यवाही सुरु आहे.

दि.२७.०७.२०२० अखेरच्या प्राथमिक अहवालानुसार बुलढाणा व हिंगोली जिल्हयात अनुक्रमे १४,६०० हे. व १०,०७३ हे. क्षेत्र नैसर्गिक आपत्तीमुळे (अतिवृष्टीमुळे) बाधित झाले असून, यामध्ये ज्वारी, बाजरी, मका, तूर, मूग, उडीद, हळद, सोयाबीन, कापूस, भाजीपाला इ. पिकांचा समावेश आहे.

### खरीप हंगाम २०२०-२१ पिक पेरणी -

राज्यात खरीप पिकांचे सरासरी क्षेत्र (ऊस वगळून) १४१.९९ लाख हेक्टर असून दि.२७ जुलै, २०२० अखेर १२९.४० लाख हेक्टर क्षेत्रावर (९१.१३%) पेरणी झाली आहे. तसेच राज्यात खरीप पिकांचे ऊस पिकासह सरासरी क्षेत्र १५१.३४ लाख हेक्टर असून १३०.४४ लाख हेक्टर क्षेत्रावर (८६%) पेरणी/लागवड झाली आहे. मागील वर्षी दि.२६.०७.२०१९ रोजी संपणाऱ्या सप्ताहाअखेर राज्यातील ऊस पिकासह पेरणी क्षेत्र ११६.४० लाख हे. (७६.९१%) तर ऊस पिक वगळून पेरणी क्षेत्र ११५.७९ लाख हे. (८१.५४%) होते.

### खरीप हंगाम २०२०-२१ पिक परिस्थिती -

राज्यात भात तसेच नागली पिकांच्या पुर्नलागवडीची कामे सुरु असून इतर पिकांच्या पेरण्या प्रगतीपथावर आहेत. पेरणी झालेली पिके उगवण ते वाढीच्या अवस्थेत असून काही ठिकाणी मूग,उडिद, सोयाबीन, भुईमूग व मका पिके फुलोरा अवस्थेत, भात व बाजरी पिके फुटवे फुटण्याच्या अवस्थेत तर बागायती कापूस पिक पाते धरण्याच्या अवस्थेत आहे. पिकांमध्ये आंतरमशागतीची (निंदणीची/कोळपणीची) कामे सुरू आहेत.

**खरीप हंगाम सन-२०२०-२१ मधील राज्यस्तरिय पेरणी क्षेत्र (लाख हे.) व टक्केवारी (दि.२७.०७.२०२० अखेर)**



## खरीप हंगाम सन-२०२०-२१ मधील पेरणी क्षेत्राचा सरासरी पेरणी क्षेत्राशी तुलनात्मक तक्ता




## खरीप हंगाम सन-२०२०-२१ मधील विभागनिहाय पेरणी क्षेत्राचा तुलनात्मक तक्ता (ऊस पिकासह)




## विभागीय पिक परिस्थिती-

### कोकण विभाग-

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. आद्रतेच्या प्रमाणात वाढ झाली असून, तपमानात घट झाली आहे. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाचा पाऊस झाला.

### खरीप हंगाम-२०२०-२१

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ४.४२ लाख हेक्टर असून दि.२७ जुलै, २०२० अखेर २.८० लाख हेक्टर क्षेत्रावर (६३.४२%) पेरणी झाली आहे. विभागात खरीप हंगामासाठी भात व नाचणी पिकांची रोपवाटिका तयार करण्याची कामे पुर्ण झाली असून अनुक्रमे ३६,९६१ हे. व ४,३४३ हे. क्षेत्रावर रोपवाटीका पेरणी झालेली आहे. चिखलणीच्या तसेच भात व नाचणी पिकांच्या पुर्नलागवडीची कामे सुरु आहेत. याशिवाय तूर, मूग, उडीद व इतर तेलबिया पिकांच्या पेरणीची कामे सुरु असून पिके उगवण ते वाढीच्या अवस्थेत आहेत.

### किड व रोग -

विभागात काही ठिकाणी भात पिकावर पिवळया खोडकिडीचा प्रादुर्भाव दिसून आला.

**नाशिक विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. हवा दमट होती. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २१.१९ लाख हेक्टर असून दि.२७ जुलै, २०२० अखेर १८.९४ लाख हेक्टर क्षेत्रावर (८९.३९%) पेरणी झाली आहे. विभागात भात रोपवाटीकेतील रोपे लागवडीच्या अवस्थेत आहेत. नागली रोपवाटिकेतील रोपे लागवडीच्या अवस्थेत आहेत. भात व नाचणी पिकाची लागवडीची कामे पावसाच्या खंडामुळे खोळंबली आहेत. पाण्याची सुविधा असलेल्या ठिकाणी बागायती भाताची लावणी सुरु आहे. ज्वारी, मका, बाजरी, तूर, मुग, उडीद, भुईमूग, तीळ, सुर्यफुल, सोयाबीन व जिरायती कापूस पिकांची पेरणी अंतिम टप्प्यात आहे. पेरणी झालेली पिके वाढीच्या अवस्थेत असून, बाजरी पिके फुटवे फुटण्याच्या अवस्थेत तर बागायती कापूस वाढ ते पाते धरण्याच्या अवस्थेत आहे.

**किड व रोग -**

विभागात काही ठिकाणी सोयाबीन पिकावर गर्डल बीटल, तंबाखुवरील पाने खाणारी अळी व खोडमाशीचा, कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी व मावा तुडतुडे या किडींचा, मका व ज्वारी पिकावर लष्करी अळीचा प्रादुर्भाव दिसून आला.

**पुणे विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ८.६७ लाख हेक्टर असून दि.२७ जुलै, २०२० अखेर १०.६३ लाख हेक्टर क्षेत्रावर (१२२.७२%) पेरणी झाली आहे. विभागात भात व नाचणी पुर्नलागवडीची कामे सुरु आहेत. मका, तूर, मुग, उडीद, भुईमूग, सुर्यफुल, कापूस व सोयाबीन पिके वाढीच्या अवस्थेत आहेत. पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे सुरू आहेत. पिक परिस्थिती चांगली आहे.

**किड व रोग -**

विभागात काही ठिकाणी मका पिकावर लष्करी अळीचा, सोयाबीन पिकावर गर्डल बीटल, खोडमाशी व उंट अळी, कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, अमेरिकन ठिपके अळी व मावा तुडतुडे इत्यादींचा प्रादुर्भाव दिसून आला.

**कोल्हापूर विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ८.१४ लाख हेक्टर असून दि.२७ जुलै, २०२० अखेर ७.७१ लाख हेक्टर क्षेत्रावर (९४.६५%) पेरणी झाली आहे. विभागात भात व रागी वगळता इतर पिकांच्या पेरण्या अंतिम टप्प्यात आहेत. भात व रागी पुर्नलागवडीची कामे वेगाने सुरु आहेत. धुळवाफ पेर भात वाढ ते फुटव्याच्या अवस्थेत आहे. ज्वारी, मका, बाजरी व कडधान्य पिके वाढीच्या ते फुटवे फुटणेच्या अवस्थेत तर भुईमूग व सोयाबीन पिके वाढ ते फुलोरा अवस्थेत आहेत. नवीन अडसाली ऊसाची लावणी चालू आहे. गळीतास जाणारा ऊस जोमदार वाढीच्या अवस्थेत आहे. पोषक पर्जन्यमान असल्याने ऊसाची वाढ समाधानकारक आहे. पिकांमध्ये आंतरमशागतीची (कोळपणी/निंदणीची) व खते देण्याची कामे चालू आहेत.

**किड व रोग –**

विभागात काही ठिकाणी मका पिकावर लष्करी अळीचा, भात पिकावर पिवळया खोडकिडीचा, सोयाबीन पिकावर खोडमाशी तर ऊस पिकावर हुमणीचा प्रादुर्भाव दिसून आला.

**औरंगाबाद विभाग-**

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २०.२३ लाख हेक्टर असून दि.२७ जुलै, २०२० अखेर १९.८१ लाख हेक्टर क्षेत्रावर (९७.९६%) पेरणी झाली आहे. विभागात कापूस, मका, बाजरी, तूर, मूग, उडीद, सोयाबीन पिकांची पेरणी अंतिम टप्प्यात आहेत. पेरणी झालेली पिके उगवण ते वाढीच्या अवस्थेत असून वाढ समाधानकारक आहे. काही ठिकाणी मूग, उडीद व सोयाबीन पिके फुले लागण्याच्या अवस्थेत तर कापूस पिक पाते धरण्याच्या अवस्थेत आहेत. पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे सुरू असून पिक संरक्षणासाठी कृषि विभागामार्फत उपायायोजना सुचविण्यात येत आहेत.

**किड व रोग –**

विभागात काही ठिकाणी मका पिकावर लष्करी अळीचा, सोयाबीन पिकावर उंट अळी, गर्डल बीटल व खोडमाशीचा, कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, अमेरिकन बोंड अळी व मावा तुडतुडे या किडींचा प्रादुर्भाव दिसून आला.

**लातूर विभाग-**

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २७.९४ लाख हेक्टर असून दि.२७ जुलै, २०२० अखेर २६.३३ लाख हेक्टर क्षेत्रावर (९४.२३%) पेरणी झाली आहे. विभागात खरीप पिकांच्या पेरणीची कामे प्रगतीपथावर असून, पिके उगवण ते वाढीच्या अवस्थेत आहेत. पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे सुरू असून, पिकांची वाढ समाधानकारक आहे.

**किड व रोग –**

विभागात काही ठिकाणी सोयाबीन पिकावर उंट अळी, गर्डल बीटल आणि खोडमाशीचा, मका पिकावर लष्करी अळीचा तर कापूस पिकावर अमेरिकन बोंड अळी व गुलाबी बोंड अळीचा प्रादुर्भाव दिसून आला.

**अमरावती विभाग-**

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. दिवस व रात्रीच्या तपमानात घट झाली असून आद्रतेचे प्रमाण वाढले आहे. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ३२.१३ लाख हेक्टर असून दि.२७ जुलै, २०२० अखेर २९.५२ लाख हेक्टर क्षेत्रावर (९१.८६%) पेरणी झाली आहे. विभागात खरीप पिके वाढीच्या अवस्थेत आहेत. तूर, सोयाबीन व कापूस पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे सुरू आहेत.

**किड व रोग –**

विभागात काही ठिकाणी मका व ज्वारी पिकावर लष्करी अळीचा, सोयाबीन पिकावर उंट अळी, गर्डल बीटल व खोडमाशीचा, कापूस पिकावर मावा तुडतुडे, गुलाबी बोंड अळी इत्यादींचा प्रादुर्भाव दिसून आला.

**नागपूर विभाग-**

**हवामान** - अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र १९.२६ लाख हेक्टर असून दि.२७ जुलै, २०२० अखेर १३.६४ लाख हेक्टर क्षेत्रावर (७०.८३%) पेरणी झाली आहे. विभागात सोयाबीन, तूर, कापूस पिके उगवण ते वाढीच्या अवस्थेत आहे. तर काही ठिकाणी मका पिक फुलोरा अवस्थेत आहे. कापूस व तूर पिकांमध्ये आंतरमशागतीची (कोळपणी/निंदणीची) कामे सुरु आहेत. भात पिकाचे पऱ्हे टाकलेले आहेत.

**किड व रोग –**

विभागात काही ठिकाणी कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, अमेरिकन बोंड अळी व मावा तुडतुडे या किडींचा, ज्वारी पिकावर लष्करी अळीचा, भात पिकावर पिवळया खोडकिडीचा व निळे भुंगेरे या किडीचा, सोयाबीन पिकावर गर्डल बीटल, तंबाखुवरील पाने खाणारी अळी, उंट अळी, खोडमाशी इत्यादींचा प्रादुर्भाव दिसून आला.

## महाराष्ट्र राज्यातील खरीप हंगामातील मुख्य पिकाखालील दि. २७.०७.२०२० पर्यंत पेरणी अहवाल

**क्षेत्र- हेक्टरमध्ये**

| अ.क्र. | पिके | सरासरी क्षेत्र (सन २०१४-१५ ते २०१८-१९) | मागिल वर्षाची पेरणी (दि.२६/०७/२०१९) | प्रत्यक्ष पेरलेले क्षेत्र | प्रत्यक्ष पेरलेल्या क्षेत्राची सरासरी क्षेत्राशी टक्केवारी | प्रत्यक्ष पेरलेल्या क्षेत्राची मागिल वर्षाच्या क्षेत्राशी टक्केवारी | +/- प्रत्यक्ष पेरणी क्षेत्राची मागिल वर्षाशी तुलना |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | भात | १५०३११९ | ५८०८५१ | ७८५७५३ | ५२ | १३५ | ३५ |
| २ | खरीप ज्वारी | ४८३२२८ | २४३३०० | २६२१०२ | ५४ | १०८ | ८ |
| ३ | बाजरी | ६७१५९४ | ४७७५७८ | ५९५२७७ | ८९ | १२५ | २५ |
| ४ | रागी | ९५५१० | ३९१३३ | ४२१९९ | ४४ | १०८ | ८ |
| ५ | मका | ८३८४७५ | ७३५५९१ | ८२७६५७ | ९९ | ११३ | १३ |
| ६ | इतर तृणधान्य | ५२६६५ | १८१३४ | २०८४८ | ४० | ११५ | १५ |
| **खरीप तृणधान्य** | | **३६४४५९१** | **२०९४५८७** | **२५३३८३६** | **७०** | **१२१** | **२१** |
| ७ | तूर | १२७४५७६ | १०५३८९० | ११९५६७१ | ९४ | ११३ | १३ |
| ८ | मुग | ४८३६२५ | २८४७८८ | ३७०५६५ | ७७ | १३० | ३० |
| ९ | उडिद | ३५९१५३ | २५७७१५ | ३६१३०४ | १०१ | १४० | ४० |
| १० | इतर कडधान्य | १००३४९ | ५८४१९ | ७०१८४ | ७० | १२० | २० |
| **एकूण कडधान्य** | | **२२१७७०४** | **१६५४८१२** | **१९९७७२४** | **९०** | **१२१** | **२१** |
| **एकूण अन्नधान्य** | | **५८६२२९४** | **३७४९३९९** | **४५३१५६०** | **७७** | **१२१** | **२१** |
| ११ | भुईमुग | २०२२९८ | १५६६०० | १८५३३४ | ९२ | ११८ | १८ |
| १२ | तीळ | २३६८६ | ९८६३ | ८०५४ | ३४ | ८२ | -१८ |
| १३ | कारळ | १९८२७ | ५४७१ | ४९३२ | २५ | ९० | -१० |
| १४ | सुर्यफुल | १७९८० | ८६९५ | १३०३२ | ७२ | १५० | ५० |
| १५ | सोयाबीन | ३८८०२४४ | ३४५३७९६ | ४०७४०५५ | १०५ | ११८ | १८ |
| १६ | इतर गळीतधान्य | १३८४६ | ३६३५ | ३९३३ | २८ | १०८ | ८ |
| **एकूण तेलबिया** | | **४१५७८८२** | **३६३८०६०** | **४२८९३४०** | **१०३** | **११८** | **१८** |
| **१७** | **कापूस** | **४१७८४११** | **४१९१७८२** | **४११८८७५** | **९९** | **९८** | **-२** |
| **एकूण पेरणी क्षेत्र** | | **१४१९८५८८** | **११५७९२४१** | **१२९३९७७५** | **९१.१** | **११२** | **१२** |
| **१८** | **उस (लागवडीचा)** | **९३५१७९** | **६११३०** | **१०३८५२** | **११** | **१७०** | **७०** |
| **एकूण पेरणी क्षेत्र (ऊसासह)** | | **१५१३३७६७** | **११६४०३७१** | **१३०४३६२७** | **८६.२** | **११२** | **१२** |

टिप- पेरणी क्षेत्र नजर अंदाजीत